**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रंमाक १ ते ३ यांच्या वादीचे वकील श्री. बी. जी. खोब्रगडे यांच्याकडून शपथेवर पुढील सरतपास –**

५. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला आहे. माझ्या शपथपत्रातील मजकूर मी वाचला आहे व तो खरा व बरोबर आहे. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रावर माझी सही आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास वादीचे वकिल श्री. ए. पी. मिश्रा यांच्याद्वारे**

६. माझे इयत्ता १० पर्यंत शिक्षण झाले आहे. मला मर्यादा कायद्याची तरतूदीची माहिती नाही. मर्यादा कायदाच्या तरतूदीबाबत मी माझ्या वकिलांना माहिती दिली होती. दावा मर्यादा कायदाच्या कोणत्या कलमा अंतर्गत बसतो ते मला सांगता येणार नाही. मी मागील ३० वर्षापासून दावा मिळकत वहिती करीत आहे. त्यामुळे मर्यादा कायदाच्या तरतुदीबाबत मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात उल्लेख केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दावा मिळकतीचा ताबा करारपत्राच्या अनुषंगाने मिळाला होता. दावा मिळकतीचे पुर्वी मालक बळीराम होते व दावा मिळकतीचे आजचे मालक मी आहे. मी दावा मिळकतीचा मालक आहे याबाबतीचा दस्त माझ्याकडे आहे. मी दावा मिळकतीचा मालक असल्याबाबतीचा दस्त दाव्यात दाखल केला आहे. साक्षीदाराने दाव्यातील कागदपत्र पाहिले व दावा मिळकत त्याच्या मालकीचे असल्याबाबतचे दस्त दाव्यात दाखल नसल्याचे नमूद केले.

७. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ पासून ते आजपर्यंत दावा मिळकतीच्या अनुषंगाने वाद चालु आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या अनुषंगाने सन १९९६ मध्ये झालेल्या करारपत्राबाबत मी न्यायालयात दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेला दावा न्यायालयाने खारिज केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा दावा खारिज केल्यानंतर मी सदर दाव्यातील वादीला दावा मिळकतीचा ताबा न देता न्यायनिर्णया विरोधात अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी अपील दाखल करुन दावा मिळकतीच्या ताब्याबाबत स्टे आदेश मिळवला होता. हे म्हणणे खरे नाही की, अपील खारिज झाल्यानंतर मला देण्यात आलेले स्टे आदेश हे संपुष्टात आले होते. अपील खारिज झाल्यानंतरही दावा मिळकतीच्या ताब्याबाबत स्टे आदेश आहे असा दाखवणारा कोणताही दस्तऐवज माझ्याकडे नाही. अपील खारिज झाल्यानंतरही मी दावा मिळकतीचा ताबा वादींना दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी अपील खारिज झाल्यानंतरही दावा

मिळकतीचा ताबा वादींना दिला नाही, म्हणून त्यांनी सन २०२२ मध्ये मौदा न्यायालयात दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने पोलिस तक्रार व तहसिलदार यांच्याकडे तक्रार करुन माझ्या दावा मिळकतीवरील ताब्याबाबत हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकतीचा प्रतिकूल ताबा या नात्याने ताबेदार आहे असे पहिल्यांदाच सदर दाव्यात नमूद करीत आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी वादींना दावा मिळकतीच्या अनषंगाने दिलेले एक लाख वीस हजार वादीने मला परत करावे असा आदेश न्यायालयाने पूर्वीचा दाव्यात दिलेला नाही. दावा मिळकतीचे क्षेत्रफळ अंदाजे २.९२ हेक्टर आहे. मी दावा मिळकत जनावर चराईसाठी घेतलेली आहे. मला दावा मिळकतीतून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. हे म्हणणे खरे आहे की, शेतामध्ये घेण्यात येणार्या पिकाचे नोंद ७/१२ उतारात घेण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २३ वरील दावा मिळकतीचा ७/१२ उतारात दावा मिळकतीमध्ये भात पीक घेत असल्याची नोंद आहे व ७/१२ उतारात चराईची नोंद नाही. मी दावा मिळकत चराईसाठी घेतली आहे असा दाखविणारा ७/१२ उतारा अथवा इतर दस्तऐवज दाव्यात हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीमध्ये रब्बी व खरीप हंगामात पीक घेउन दरवर्षी पन्नास हजाराचे उत्पन्न घेतो. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २३ वरील दावा मिळकतीचा ७/१२ उतारावर मालक म्हणून वादीचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी बळीराम यांचे वारस आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी बळीरामचे वारस आहे हे मला पूर्वीपासून माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकती ताबा वादींना द्यायचा नाही म्हणून मी माझ्या पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
मौदा.
दिनांक १४.११.२०२५

समक्ष
**स्वाक्षरी/–**
(एल.एम. पठाण)
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,**
मौदा